मानवी हक्कांचा दुटप्पी कळवळा

चन्द्रशेखर पुरन्दरे

'व्यक्तिस्वातंत्र्य-मानवी हक्क' या मूल्यांचा जप पश्चिमी जग सतत करत असतं. पश्चिमेतर जगातल्या मानवी हक्कांच्या पायमल्लीबद्दल अमेरिका-युरोपीय देशांमधून नेहमीच आगपाखड होत असते. अलिकडे, तिबेटींचा स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष चीनने दडपशाहीने मोडून काढला. त्याविरोधात पश्चिमेने मोठा गळा काढला. मानवी हक्कांची पायमल्ली कोणत्याही प्रकारे समर्थनीय नसते. हे खरं असलं तरी या संदर्भात पश्चिमेचं वर्तन तरी किती स्वच्छ आहे, याचा परामर्श!

जागतिकीकरणाला आर्थिक बाजूंबरोबर सामाजिक बाजूही आहेत. अर्थव्यवस्था खुली व खासगी होणं, ती बाजारकेंद्रित होणं, या आर्थिक बाजू झाल्या. राज्यसंस्थांचं जगभर बदलत असलेलं स्वरूप, उपभोक्तावादी मूल्यव्यवस्थेचा उदय, पारंपारिक अस्तिमांना धक्का या सामाजिक बाजू आहेत. आपल्याकडे जागतिकीकरण हा वसाहतवादाचा नवा अवतार मानला जातो. आर्थिकदृष्ट्या ती समजूत फारशी बरोबर नाही. कारण 'आहे-रे' आणि 'नाही-रे' या वर्गातील अंतर पश्चिमेतही वाढत आहे. मात्र, सामाजिकदृष्ट्या हा नवा वसाहतवाद आहे, असं मानता येईल. त्यायोगे एक समाज आपली मूल्यव्यवस्था, म्हणजे आपली आचारविचार पद्धती दुसऱ्या समाजावर लादण्याचा प्रयत्न करतो. जागतिकीकरणाद्वारे पश्चिम आज आपली मूल्यं उर्वरित जगावर लादत आहे असं दिसतं. या सामाजिक वसाहतवादात 'मानवी हक्क' हे कळीचं मूल्य आहे. 'मानवी हक्क' म्हणजे 'माणूस म्हणून जगण्याचा हक्क' असं एक गृहीत आपण मानू. कारण निरनिराळ्या पाश्चिमात्त्य राष्ट्रसंघटनांनी १९४८, १९५४ व १९६६ मध्ये मानवी हक्कांच्या ज्या निरनिराळ्या व्याख्या केल्या आहेत, त्यामध्ये बरेच अंतर्विरोध आणि गफलती आहेत. त्या शब्दच्छलात शिरण्याचं इथं प्रयोजन नाही.

'मानवी हक्क' हे मूल्य पश्चिमेत किती महत्त्वाचं मानलं जातं (ते 'पाळलं' जातंच असं नाही) ते एक-दोन उदाहरणांवरून स्पष्ट व्हावं. पहिलं उदाहरण चीन-तिबेट संघर्षाचं. चीनमध्ये नुकत्याच झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर गेल्या मार्चमध्ये तिबेटचा प्रश्न पुन्हा एकदा जगासमोर आला. चिनी आधिपत्याला विरोध करणारे तिबेटी तिथं रस्त्यावर आले. तिबेटींचा असंतोष चीनने लष्करी बळाचा वापर करून दडपला. या दडपशाहीचे प्रतिसाद पश्चिमेत तत्काळ आणि तीव्रपणे उमटले. ऑलिम्पिक तोंडावर आलं असताना हे प्रकरण आंतरराष्ट्रीय स्तरावर चीनला चांगलंच महागात गेलं. युरोपभर चीनविरोधी निदर्शनांची लाट उसळली. मार्चमध्ये ऑलिम्पिक ज्योतीचा ग्रीसमधून चीनकडे प्रवास सुरू झाला. या प्रवासात युरोप-अमेरिकेत ठिकठिकाणी निदर्शनं झाली. काही ठिकाणी संघर्षही झाला. याच दरम्यान चीनमध्ये मानवी हक्कांची पायमल्ली कशी होते याचा वार्षिक अहवाल अमेरिकेने प्रसृत केला. प्रसारमाध्यमं, राजकीय नेते जणू अशा संधीची वाट पाहत असल्यासारखे चीनवर तुटून पडले. एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. ती म्हणजे, चीनने तिबेट गिळंकृत करणं न्याय्य का अन्याय्य. हा इथं मुद्दा नाही. तिबेटच्या संदर्भात पाश्चिमात्यांची चीनवरील टीका ग्राह्य ठरते का, हा मुद्दा आहे.

दुसरं उदाहरण वैयक्तिक संदर्भातलं आहे. युरोपातील स्थलांतरित, या विषयावर मध्यंतरी एका जर्मन युवतीशी माझी चर्चा झाली. जर्मनीत स्थलांतरित तुर्क मोठ्या प्रमाणावर आहेत. या युवतीचे काही मित्रही तुर्कस्तानी आहेत. पण स्त्रियांना (युरोपच्या दृष्टीनं) 'तुच्छतेनं' वागवणाऱ्या, स्त्रियांचे मानवी हक्क डावलणाऱ्या या तुर्कांना ती बरोबरीचं मानू शकत नाही, असं तिनं स्पष्ट केलं. थोडक्यात, वैयक्तिक देवाण-घेवाणीतही 'मानवी हक्क' हा पश्चिमेच्या मानसिकतेचा महत्त्वाचा भाग झालेला आहे. मानवी हक्कांबद्दल अशा प्रकारे 'जागरूक' असलेल्या पाश्चिमात्यांचं स्वतःचं आचरण कसं आहे, हा मुद्दा आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर ज्यूंचं शिरकाण केल्याबद्दल काही जर्मन नेत्यांवर खटले भरण्यात आले. त्या दरम्यान मानवी हक्क या संकल्पनेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर जन्म झाला. पुढं संयुक्त राष्ट्रसंघ स्थापन झाल्यावर 'मानवी हक्कांचं पालन' हे मूलभूत धोरण सगळ्या सभासद राष्ट्रांना लागू करण्यात आलं. तेव्हापासून

'मानवी हक्क' या कसोटीवर पश्चिमी जग इतर देशांना जोखतं. असं करताना, याआधीच्या काळात पाश्चिमात्यांच्या वसाहतवादाविरोधात आशिया-आफ्रिकेतील स्वातंत्र्यलढे, अमेरिकेतील गुलामगिरीच्या विरोधातला संघर्ष, हेदेखील मानवी हक्कांचेच लढे होते, हे पश्चिमी जगाकडून सोयिस्कररीत्या नाकारलं जातं.

सुरुवातीला पश्चिमी धर्मोपदेशक आफ्रिका-आशिया खंडात आले. जे गोऱ्या रंगाचे नाहीत ते असंस्कृत आहेत, त्यांना 'माणूस' करायचं असेल तर 'आपली' संस्कृती शिकवली पाहिजे, हा त्यांचा आदर्शवाद होता. या धार्मिक वसाहतवादाच्या पाठोपाठ आर्थिक वसाहतवादाने दक्षिण अमेरिका, आशिया, आफ्रिका खंडांत बस्तान बसवलं. तंत्रज्ञान आणि आर्थिक सामर्थ्यावर पाश्चिमात्य संस्कृती हीच एकमेव संस्कृती असल्याचं उर्वरित जगाच्या मनावर बिंबवण्यात पश्चिम यशस्वी झाली. कोणत्याही देशाची 'प्रगती' ही तो देश पाश्चिमात्य संस्कृतीच्या किती जवळ जातो, यावर ठरू लागली.

या वसाहतवादाचा उद्देश या देशांची संपत्ती पश्चिमेत नेणं, हा होता. त्यामुळे पाश्चिमात्यांच्या अधिपत्याखाली गेलेले देश उत्तरोत्तर गरीब होत गेले. 'आम्ही तुम्हाला लुटतो आहोत' हे झाकण्यासाठी काहीतरी नैतिक अधिष्ठान आवश्यक असतं. त्यातून आमची संस्कृती तुमच्या संस्कृतीपेक्षा वरच्या दर्जाची आहे, हा युक्तिवाद पुढं आला. थोडक्यात, एकीकडे लुटालूट करायची आणि दुसरीकडे सुसंस्कृत असल्याचा टेंभा मिरवायचा, हा दुटप्पीपणा होता. हाच दुटप्पीपणा आजही दिसतो.

पश्चिमी संस्कृती ज्या मूल्यांवर आधारलेली आहे ती मूल्यं व्यक्तिकेंद्रित आहेत. व्यक्तीच्या आचार-विचाराचं, अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य पश्चिमी जग महत्त्वाचं मानतं. लोकशाही या मूल्याचा विकास यातूनच घडला. ही मूल्यं निश्चितच प्रगत आहेत. त्याबद्दल दुमत असायचं कारण नाही. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की वसाहतवादातून मिळालेल्या संपत्तीतून पश्चिमी जनतेच्या अन्न-वस्त्र-निवारा या प्राथमिक गरजा आणि आरोग्य-शिक्षण-करमणूक या दुय्यम गरजा पुरेशा भागल्यानंतर व्यक्तिस्वातंत्र्याच्या सांस्कृतिक गरजा 'हक्क' म्हणून पुढं आल्या. दुसरीकडे वसाहतवादाच्या जोखडाखाली अनेक देश भरडले गेले, नागवले गेले, गरीब झाले. जिथं जनतेच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचाच प्रश्न आहे, तिथं पश्चिमी जग त्यांची मानवी हक्कांच्या नावाखाली आणखी कोंडी करत आहे. पुन्हा हे स्पष्ट करणं गरजेचं आहे, की प्रश्न मानवी हक्क विरुद्ध मूलभूत गरजा, असा नाही, तर पश्चिमी जग मानवी हक्कांचा राजकीय हत्यार म्हणून कसा वापर करत आहे, हे पाहणं हा उद्देश आहे.

पश्चिमी जगाने मानवी हक्कांची व्याख्या आपल्या सोयीची केली आहे आणि ती उर्वरित जगाने मानावी असा त्यांचा आग्रह आहे. पश्चिमेच्या आचार व विचारात मोठा विरोधाभास आहे. उदाहरणार्थ, जगाच्या लोकसंख्येत अल्पसंख्याक असणाऱ्या पश्चिमेने पर्यावरणाची हानी मात्र फार मोठ्या प्रमाणावर केली आहे. पश्चिमेच्या राहण्या-वागण्याच्या सवयी, त्यांचं आचारस्वातंत्र्य उरलेल्या जगाच्या जगण्यावरच घाला घालतं. मात्र, या आचारस्वातंत्र्यावर आळा घालणं पश्चिमेला मंजूर नाही. इतर देशांवर युद्ध लादणं, यासारखा तर मानवी हक्काविरुद्धचा गुन्हा नाही. पण प्रत्येक दशकात असं एक तरी युद्ध पश्चिमेनं लादलेलं आहे. दुसरं म्हणजे, पश्चिमेच्या आशीर्वादातून मानवी हक्कांची पायमल्ली करणाऱ्या शक्ती अनेक देशांमध्ये मजबूत झाल्याची अनेक उदाहरणं आपल्यासमोर आहेत. त्यामुळे उर्वरित जगाला मानवी हक्क शिकवण्याचा नैतिक अधिकार पश्चिमेला आहे का, हा प्रश्न आहे.

पश्चिमेच्या सामाजिक वसाहतवादात आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघटनांचा मोठा सहभाग दिसतो. आर्थिक जागतिकीकरणात बहुराष्ट्रीय कंपन्या जी भूमिका बजावतात, तीच भूमिका लंडन, पॅरिस, न्यूयॉर्कमध्ये मुख्य ऑफिस असणाऱ्या बहुराष्ट्रीय स्वयंसेवी संघटना बजावत असतात. विकसनशील देशांमधील सामाजिक दुखण्यांवर इलाज करण्याऐवजी या दुखण्यांच्या लक्षणांवर या संस्था लक्ष केंद्रित करतात. त्यामुळे दुखणं ज्या सामाजिक-राजकीय व्यवस्थेमुळे निर्माण झालेलं असतं, ती व्यवस्था शाबूतच राहते.

स्वयंसेवी संघटनांबरोबर जागतिक बँक, संयुक्त राष्ट्रसंघाच्या विविध संस्था विकसनशील जगात मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. जागतिक बँक जगभर खासगीकरणाला प्रोत्साहन देत आहे. बोलिव्हिया, जॉर्जिया अशा अनेक देशांमध्ये पाणी, तेल, खनिजे अशा नैसर्गिक साधनसंपत्तीच्या खासगीकरणाचे प्रयोग झाले. त्यासाठी पश्चिमी जगातून मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक होत असते. अशा प्रकारे खासगीकरणाला चालना देताना स्थानिकांचे प्रश्न, त्यांच्या गरजा यांना धाब्यावर बसवलं जातं. बहुराष्ट्रीय कंपन्या मानवी हक्कांचं उल्लंघन जास्त प्रमाणात करतात. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलसारख्या मानवी हक्कांवर काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघटनेचा भर कायद्याचा कीस काढण्यावर असतो. मुळात अशा संघटनांना स्थानिक माहिती तरी नीट नसते किंवा त्यांचे त्या देशातील स्थानिक प्रतिनिधी पश्चिमी व्यवस्थेच्या चौकटीत अडकलेले असतात. बहुराष्ट्रीय कंपन्यांवर मानवी हक्कांच्या पालनाची कायदेशीर बंधनं कमी असतात. शिफारसवजा धोरणं त्यांनी पाळावीत अशी अपेक्षा

असते. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी या जागतिक बँकेच्या धोरणातील तरतुदी अजूनही इतक्या ढोबळ आहेत, की त्यातून पळवाटा काढणं बहुराष्ट्रीय कंपन्यांना सहज शक्य असतं. त्या मानवी हक्कांची अंमलबजावणी करतात का नाही, याची तपासणी करणाऱ्या सरकारी यंत्रणा विकसनशील देशांत अक्षम तरी असतात किंवा भ्रष्टाचारी तरी असतात. अशा वेळी मानवी हक्कांचं उल्लंघन झालं, तर जागतिक बँकेला किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांना जबाबदार धरण्याऐवजी त्या-त्या देशाच्या सरकारला जबाबदार धरलं जातं. विशेषत: संसदीय लोकशाही नसलेल्या देशांवर हा रोख असतो. ९० च्या दशकात महासत्ता म्हणून रशियाचं अस्तित्व संपुष्टात आलं. रशिया आता पुन्हा नव्याने उभा राहत आहे. गेल्या काही वर्षांत चीनने मोठी झेप घेतली आहे. नवी महासत्ता म्हणून चीन उदयाला येत आहे. पश्चिमेला याचं भय आहे. त्यामुळेच चीन-रशियाकडे त्यांचा रोख अधिक दिसतो.

गेल्या वीस-पंचवीस वर्षांत चीनने तीस-पस्तीस कोटी लोकांना दारिद्र्यरेषेवर आणलं. जगाच्या इतिहासात भौतिक प्रगतीची ही अभूतपूर्व घटना आहे. रशियामध्ये पुतीन राष्ट्राध्यक्ष झाल्यावर खनिज तेलाच्या निर्यातीतून रशियाची आर्थिक स्थिती सुधारली. तिथल्या बऱ्याच लोकांचं राहणीमान सुधारलं व सामाजिक सुरक्षितताही वाढली. आज चीनची पश्चिमेबरोबर व्यापारात भागीदारी वाढली आहे. तर रशिया हा युरोपला ऊर्जा पुरवणारा एम महत्त्वाचा देश बनला आहे. हे दोन्ही देश अण्वस्त्रधारी आहेत. लष्करी बळाच्या दृष्टीने प्रगत आहेत. त्यामुळे पश्चिमी जगाला या देशांचा धोका वाटतो. त्यामुळे या देशांमध्ये मानवी हक्कांचे प्रश्न उभे राहिले की पश्चिमी देश मोठा गहजब करतात. अलीकडच्या काळात रशियाने फुटीरतावादी प्रवृत्ती मोडून काढण्यासाठी कठोर पावलं उचलली. चीननेही तिबेटींचं आंदोलन दडपण्यासाठी अवाजवी बळ वापरलं. अमेरिका-युरोपीय देशांनी त्याविरोधात आगपाखड केली. चीन-रशियाप्रमाणेच भारत आणि ब्राझील हे देशही प्रगती करत आहेत. चीन आणि रशियाच्या तुलनेत भारत-ब्राझीलबाबत पश्चिमेचं धोरण तुलनेने मवाळ असलं, तरी संधी मिळताच काश्मीरमधील मानवी हक्क, जातीय अत्याचार, अगदी सतीची प्रथा यांची आठवण करून दिली जाते. ब्राझीलमधील तुरुंगांतील कैद्यांची अवस्था, विस्थापितांचे प्रश्न यांना महत्त्व दिलं जातं. अर्थात, या देशांमधील या परिस्थितीचं कोणत्याही प्रकारे समर्थन होऊ शकत नसलं, तरी पश्चिमेचा खरा उद्देश हे देश आर्थिक प्रगती करत असले, तरी सांस्कृतिकदृष्ट्या किती मागासलेले आहेत, हे दाखवण्याचाच असतो.

उर्वरित जगातल्या मानवी हक्कांच्या पायमल्लीबद्दल ओरड करणाऱ्या पश्चिमेचं वर्तनही तपासून पहायला हवं, म्हणजे या संदर्भात काही बोलण्याचा अधिकार त्यांना आहे का, हे लक्षात येईल. ११ सप्टेंबर २००१ च्या दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिका-युरोपीय देशांनी व्यक्तिस्वातंत्र्यावर अनेक मर्यादा आणल्या आहेत. विशेषत: अल्पसंख्याक आणि आशिया-आफ्रिकेतून आलेल्या स्थलांतरितांवर. ब्रिटनमध्ये संशयावरून कोणालाही विनाचौकशी महिनाभर पोलीस कोठडीत अडकवण्याचा कायदा झाला. या कायद्याचा रोख विशेषत्वाने स्थलांतरितांकडे आहे. अमेरिकेने दहशतवादी कृत्याबद्दल अटक केलेल्या संशयितांसाठी ग्वांटानामो इथं उभा केलेला तुरुंग, हे तर मानवी हक्कांच्या पायमल्लीचं थेट उदाहरण आहे. अफगाणिस्तानातील युद्धापासून तिचं अनेक संशयित विनाचौकशी खितपत पडले आहेत. तिथं त्यांना कशाप्रकारे वागवण्यात येतं याची छायाचित्रंही प्रसिद्ध झाली आहेत. तिथल्या अनेक कैद्यांचं मानसिक संतुलन बिघडलं आहे. काहींनी आत्महत्याही केल्या आहेत. व्हिएतनाम, अफगाणिस्तान, इराकवर अमेरिका आणि त्याच्या युरोपीय मित्रांनी लादलेली युद्धं जगजाहीर आहेतच.

जगभर तुरुंगांत असणाऱ्या कैद्यांची देशवार आकडेवारी पाहिली तर अमेरिकेत सगळ्यात जास्त लोक तुरुंगात आहेत. त्यातील कित्येक निरपराधी असतात, कित्येकांचे खटले आयुष्यभर कोर्टापर्यंत येतही नाहीत. विकसित देशांमध्ये अमेरिका हा एकच देश आहे जिथं फाशीची शिक्षा अजून चालू आहे. दुसऱ्याच्या डोळ्यातलं कुसळ दिसतं. आपल्या डोळ्यातलं मुसळ दिसत नाही, या म्हणीनुसार पश्चिमेचं हे वर्तन आहे.

मानवी हक्कांचा एकूण परामर्श घेता दोन गोष्टी पुढं येतात : एक तर ऐतिहासिकदृष्ट्या पश्चिम उर्वरित जगाशी ज्याप्रकारे वागलेली आहे, त्यामुळे कोणतीही 'चांगली' गोष्ट पश्चिमेने सांगितली तरी त्याकडे संशयानं पाहिलं जातं. दुसरं म्हणजे विकसनशील जगाने आपल्या समाजाला साजेशी मानवी हक्कांची ढोबळ व्याख्याही आजवर केलेली नाही. त्यामुळे पश्चिमेने बनवलेली व्याख्याच मापदंड म्हणून वापरली जाते आणि त्यातून ताणतणाव निर्माण होतात. सध्या तरी या परिस्थितीला पर्याय दिसत नाही.

चन्द्रशेखर पुरन्दरे
Email - artnondeco@yahoo.co.uk
Website - www.art-non-deco.com

❐